महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कायालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र/महाज्योती/स्पर्धा-परीक्षा/२१३०/२०२६-२७ दि:-२८/११/२०२६

परिपत्रक

विषय :- महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनेअंतर्गत विद्यार्थांची निवड करण्याकरीता आरक्षणाबाबत.

महाज्योती संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे, सदर योजनेंतर्गत सिविल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल या शाखेतील पदवीधर विद्यार्थांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षेचे ११ महिन्याचे परीक्षापूर्व प्रशिक्षण दिले जाते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अभियांत्रिकी सेवेकरिता सिविल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल या शाखेतील विद्यार्थांकरीता मागील ५ वर्षात काढण्यात आलेल्या जागांकरीताच्या जाहिरातीचे अभ्यास केले असता असे निदर्शनास आले की सिविल या शाखेतील विद्यार्थांकरिता मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल शाखेतील विद्यार्थांच्या प्रमाणात जास्त जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येते, त्यामुळे महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनेंतर्गत सिविल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल या शाखेतील विद्यार्थांची निवड खालीलप्रमाणे नमूद आरक्षणानुसार करून विद्यार्थांना प्रशिक्षण योजनेचा लाभ देण्यात येईल.

अ.क्र	शाखा	टक्केवारी
१.	सिविल	८० %
२.	मेकॅनिकल	१० %
३.	इलेक्ट्रिकल	१० %
एकूण		**१०० %**

त्याचप्रमाणे इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत राज्यातील विमुक्त-जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थांच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, वनार्टी संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे, त्यामुळे महाज्योती संस्थेच्या आरक्षणात पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ.क्र	प्रवर्ग	टक्केवारी
१	इतर मागासवर्ग (OBC)	६८ %
२	विशेष मागासवर्ग (SBC)	७ %
३	विमुक्त जाती - अ (VJ-A)	७ %
४	भटक्या जमाती - ब (NT-B)	६ %
५	भटक्या जमाती - क (NT-C)	८ %
६	भटक्या जमाती -ड (NT-D)	४ %
एकूण		**१०० %**

- दिव्यांग व अनाथ विद्यार्थांकरीता आरक्षण पूर्वीप्रमाणे लागू राहील.

वरीलप्रमाणे विद्यार्थांना महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनांचे लाभ देण्यात येईल, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

स्वा
(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), नागपूर